नि.दि.दा.क्र. ६३/२०१९

नि. २९ लगत

**<u>उर्वरित उलटतपास प्रतिवादींतर्फे ॲड आर.बी.भोसले यांच्यातर्फे शपथेवर सुरु–</u>**

हे म्हणणे खरे आहे की मी पोलीस खात्यामध्ये, आर.के.रबर कंपनी व जर्मन रेमीडीज कंपनी यामध्ये नोकरी करत होतो या बाबत कोणतेही कागदपत्र पटलावर दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझी पत्नी कुपर हॉस्पीटल मुंबई या ठिकाणी नोकरी करत होती याबाबतचा पुरावा देखील मी पटलावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.०७/०४/१९९४ रोजी प्रतिवादीला रक्कम रुपये दहा लाख दिल्याचा कोणताही पुरावा पटलावर दाखल नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की आज ती कागदपत्र पटलावर दाखल करणार आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यात व प्रतिवादीमध्ये कोणताही आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार झाला नाही.

हे म्हणणे खरे आहे की अरुणा कांबळे ही आमच्या कुटुंबातील सदस्य नाही. हे म्हणणे खरे आहे की अरुणा कांबळे ही प्रतिवादी सोबत राहत होती असे दाखवणारा कोणताही कागद मी पटलावर दाखल केला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की तसा कागद दाखल करण्यास मी तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.दि.दा.क्र.१४५/२०१२ मध्ये माझ्यात व प्रतिवादीमध्ये कोणतीही तडजोड झाली नाही. हे म्हणणे खरे आहे की माझ्या व प्रतिवादीच्या बहिणी यांनी वाद मिळकतीमधील कोणतेही हक्क सोडलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या दाव्यामध्ये बहिणींनी तोंडी हक्क सोडून दिल्याचे मी खोटे नमुद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकतीचा कब्जा माझ्या ताब्यात नाही. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकतीचा कब्जा माझ्या ताब्यात असल्याबाबत मी वादपत्रामध्ये चुकीचे नमुद केले आहे. मी प्रतिवादीला घर बांधकामासाठी सपाटीकरणासाठी मुलीच्या लग्नासाठी बॅंकेच्या ठिबक सिंचनाच्या थकीत कर्जासाठी वेळोवेळी रक्कम रुपये दहा लाख दिले त्यांच्या तारखा मला सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी रक्कम रुपये वीस लाख देणे लागतो याबाबतचा तपशील मी दाव्यात दाखल केला नाही. त्याचप्रमाणे त्याबाबतची कागदपत्र पटलावर दाखल केलेली नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की दि.१९/०६/२०१८ ला प्रतिवादीने जीवे मारण्याची धमकी दिली वाद मिळकतीमध्ये जाण्यास हरकत अडथळा केला हे दाखवणारा कोणताही कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल केला नाही. हे म्हणणे खरे आहे की दि.२०/०७/२०१८ रोजी प्रतिवादीस नोटीस दिली ती पटलावर दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीच्या नावाच्या ७/१२ ला असलेल्या वाद मिळकतीच्या नोंदी अदयाप पर्यंत महसुल खात्यामध्ये त्याबाबत आक्षेप अर्ज दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की गट नं.१२८ मध्ये माझा व प्रतिवादीचा वडीलार्जित २ आणे एवढा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीचा वाद मिळकतीमध्ये ६ आण्याचा खरेदीचा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे आहे की वाद मिळकतीमध्ये माझा १४ आणे हिस्सा असल्याबाबत मी कोणतीही कागदपत्रे पटलावर दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की शपथपत्रातील मजकूर वकीलांच्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आला व मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीला त्रास देण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला.

**श्रवणोत्तर स्वीकृत**

कोरेगाव **(पी.डी.यवतकर)**

दि. १०/०९/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश कोरेगाव.